|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय

जा.क्र. कबचौउमवि/08/226/2025 दिनांक:- 09.04.2025

## -: परिपत्रक :-

प्रति,
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र**
**विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे**
**मा. प्राचार्य तसेच संस्थांचे मा.संचालक यांना ... ...**

**विषय:-** आयसीआयसीआय बँकेच्या सेवा-सुविधांचा लाभ घेणेबाबत..........

**महोदय/महोदया,**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिसरात आयसीआयसीआय बँकेची शाखा नव्याने सुरु करण्यात आली असून, त्यासंदर्भात विद्यापीठाने सदर बँकेसोबत दिनांक 11.12.2024 रोजी सामंजस्य करार (MoU) केलेला आहे.

सदर बँकेमार्फत पगार खाते व इतर खात्यांना कोणतेही शुल्क न आकारता (विनामुल्य) आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, आवश्यक ते फायदे, जसे विमा संरक्षण व इतर बाबी खातेधारकाच्या कुटूंबासाठीदेखील लागू करण्यात आलेल्या आहेत.

आपणदेखील आपल्या महाविद्यालयाचे/ संस्थांचे सदर बँकेत बचत खाते उघडून, सदर बँकेच्या उपलब्ध असलेल्या अद्ययावत सोयी-सुविधांचा लाभ घ्यावा, असे सदर परिपत्रकान्वये आपणास आवाहन करण्यात येत आहे. सदर प्रयोजनासाठी **श्री. विशाल सरप,** संपर्क अधिकारी, आयसीआयसीआय बँक, जळगाव **(मोबाईल क्रमांक 9922774977)** आणि/ किंवा त्यांचे सहकारी आपणाशी संपर्क साधतील. तरी सदरबाबतीत त्यांना योग्य ते सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
वित्त व लेखा अधिकारी

**प्रत माहितीस्तव:-**
श्री.विशाल सरप,
संपर्क अधिकारी, आयसीआयसीआय बँक,
जळगाव.